दिनांक :- ६/८/२०१८

# जाहिरात

डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजनेंतर्गत नोंदणीकृत संस्थांना वसतिगृह चालविण्यासाठी शासकीय व इतर इमारती भाडयाने देणेबाबत जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी यांचेमार्फत शासन निर्णय उच्च व तंत्रशिक्षण विभाग दिनांक १३/०७/२०१८ अन्वये अमागास विद्यार्थ्यांकरिता वसतीगृह निर्वाहभत्ता योजनेची अंमलबजावणी करण्याकरिता नोंदणीकृत संस्थांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

तरी याव्दारे आवाहन करण्यात येते की, इच्छूक नोंदणीकृत संस्थांनी www.parbhani.gov.in या संकेतस्थळावरील अटी व शर्ती चे अधिन राहून दि.१३/०८/२०१८ पूर्वी आपले अर्ज सर्व आवश्यकत्या कागदपत्रांसह जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी येथील सामान्य प्रशासन विभागामध्ये सायं.५.०० वाजेपर्यंत सादर करण्यात यावे. यानंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

**जिल्हाधिकारी,परभणी**

**डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजनेंतर्गत नोंदणीकृत संस्थांना वसतिगृह चालविण्यासाठी शासकीय व इतर इमारती भाडयाने देणे बाबतची कार्यपध्दती .**

**<u>अटी व शर्ती</u>**

१. डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजनेंतर्गत नोंदणीकृत संस्थांना वसतिगृह चालविण्यासाठी शासकीय व इतर इमारती भाडयाने देणे बाबत अर्ज मागविण्यात येत आहेत.

२. निवड केलेल्या संस्थेने खालीलप्रमाणे कागदपत्रे सादर करणे आवश्यक राहिल.

    १) संस्था नोंदणीकृत असल्याचा पुरावा.
    २) पॅन कार्ड
    ३) मागील ३ वर्षाचे IT Returns (Assessment Year - २०१५-१६ , २०१६-१७ , २०१७-१८ )
    ४) अनुभव प्रमाणपत्र
    ५) लेखा परिक्षणाची प्रत. (२०१४-१५ , २०१५-१६ , २०१६-१७ )
    ६) संस्थेने यापूर्वी प्रशंसनीय / उल्लेखनिय काम केले असल्यास त्या बाबतची कागदपत्रे.

३. मागणी करणारी संस्था ही मुंबई विश्वस्त कायदा, १९५० किंवा संस्था नोंदणी कायदा, १८६० अंतर्गत नोंदणीकृत असावी.

४. अशा संस्थांची मागणी आल्यास अनुभवी व जास्त क्षमता असणा-या संस्थांना प्राधान्य देण्यात येईल.

५. जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी कार्यरत असणा-या संस्थांना प्राधान्य देण्यात येईल.

६. एकापेक्षा अनेक संस्थांची मागणी आल्यास अनुभवी व जास्त क्षमता असणा-या संस्थांना प्राधान्य देण्यात येईल.

७. संस्थेची निवड केल्यानंतर त्या संस्थेशी ५ वर्षाचा भाडे कराररनामा जिल्हाधिकारी यांच्या वतीने करण्यात येईल. निवड केलेल्या संस्थेने वार्षिक भाडयाची रक्कम शसनाकडे जमा करणे आवश्यक राहील. सदरचे भाडे रु.१००/- प्रतीमाह इतके नाममात्र असेल.

८. शासकीय इमारत निवड केलेल्या संस्थेस हस्तांतरीत केल्यानंतर त्या इमारतीमधील सर्व प्रकारच्या परीरक्षणाची जबाबदारी निवड केलेल्या संस्थेची राहील. यासाठी कोणत्याही स्वरुपाचे अनुदान शासनाकडून देण्यात येणार नाही.

९. वसतिगृहामध्ये विद्यार्थ्यांना आवश्यक त्या सुविधा जसे वीज, पाणी,इंटरनेट ,खाणावळ (जेवणाची व्यवस्था), साफसफाईची व्यवस्था, सुरक्षिततेची व्यवस्था इत्यादी पुरवण्याची जबाबदारी निवड केलेल्या संस्थेची राहिल. यासाठी सामाजिक न्याय व विशेष सहाय विभागामार्फत चालविल्या जाणा-या वसतीगृहासाठी विहीत करण्यात आलेले निकष / नियमावली संस्थेने उपयोगात आणावी लागेल.

१०. नाश्ता व भोजन हे सामाजिक न्याय व विशेष विभगाचा शासन निर्णय क्र.बीसीएच२०१०/प्र.क्र.४३०/मावक-४ दि.२६ जूलै, २०११ सोबत जोडलेल्या परिशिष्ट - १ नूसार देणे बंधनकारक राहील.

११. मुलींच्या वसतीगृहात सर्व कर्मचारी हे महिला असतील. पुरष कर्मचा-यांची तेथे नियुक्ती करता येणार नाही.

१२. सुरक्षेसाठी आवश्यक इतके सेक्युरीटी गार्डची नियुक्ती करावी लागेल.

१३. मुलांची / मुलींची आजाराबाबत तक्रार असल्यास त्यांची तपासणी शासकीय रुग्णालयात करुन घेण्याची व अशा मुलांच्या पालकांना तात्काळ माहिती देण्याची जबाबदारी संबंधित संस्थेची राहील.

१४. सुविधां बाबत कोणत्याही तक्रारी प्राप्त झाल्यास आणि सुविधा असमाधानकारक असल्याचे जिल्हाधिकारी यांचे मत झाल्यास अथवा इमारतीमध्ये गैरकृत्य होत असल्याचे अथवा इमारतीचा वापर अन्य प्रयोजनासाठी करण्यात येत असल्याचे निदर्शनास आल्यास आवश्यक ती पूर्वसूचना देऊन व संस्थेचे म्हणणे ऐकून अशा

संस्थेशी केलेला करारनामा रदद करण्याचे आधिकार जिल्हाधिकारी यांना राहतील. करारनामा रदद केल्यानंतर नियत दिनांकास अथवा जास्तीत जास्त एक महिन्याच्या आत इमारतीचा ताबा संबंधित संस्थेने जिल्हाधिकारी यांना परत करणे गरजेचे राहील. नियत दिनांकास इमारतीचा ताबा संस्थेस परत न केल्यास संस्थेकडून प्रचलीत भाडयाच्या दुप्पट दराने महसूली वसुली करण्यात येईल.

१५. डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजनेखाली विद्यार्थ्यांना दिल्या जाणा-या निर्वाह भत्याची रककम पात्र विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात शासनाकडून जमा करण्यात येईल. वसतिगृहाचा लाभ घेणा-या विद्यार्थ्यांकडून ही रककम निवड केलेल्या संस्थेस देण्यात येईल, या व्यतिरिक्त कोणतेही अनुदान शासनाकडून दिले जाणार नाही.

१६. वसतिगृह चालविण्यासाठी आवश्यक तो कर्मचारी वर्ग कंत्राटी तत्वावर निवड केलेल्या संस्थेने नियुक्त करणे आवश्यक राहील. या कर्मचा-यांचे कोणत्याही स्वरुपाचे दायित्व शासनावर राहणार नाही असा उल्लेख करारनाम्यामध्ये करण्यात येईल.

१७. निवड केलेल्या संस्थेने काम करतेवेळी आवश्यक मणुष्यबळ, लागणारी साधनसामुग्री या संदर्भातील माहिती करारनामा करतेवेळी सादर करणे बंधनकारक राहिल.

१८. निवड केलेल्या संस्थेने नियुक्त केलेल्या कर्मचा-यास वसतिगृहा अंतर्गत काम करतेवेळी कुठल्याही प्रकारची इजा अथवा दुर्घटना झाल्यास कोणत्याही प्रकारची अन्य नुकसान भरपाई देण्याची जबाबदारी जिल्हाधिकारी कार्यालयाची राहणार नाही.

१९. निवड केलेल्या संस्थेचे ज्या कामगाराव्दारे काम करुन घेतले जाईल ते काम ठेकेदाराचे काम असे संबोधले जाईल, व त्याचा नोकरी बाबत कसलाही संबंध राहणार नाही. यदाकदाचित कामगाराने नोकरी विषयक प्रश्न न्यायालयात ठेवल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी ठेकेदाराची असेल.

२०. निवड केलेल्या संस्थे मार्फत पुरविण्यात येणा-या कंत्राटी कर्मचा-यांचे दोन फोटो निवडणूक ओळखपत्र, आधारकार्ड, जिल्हाधिकारी कार्यालयात सादर करणे बंधनकारक राहिल.

२१. निवड केलेल्या संस्थेनेच काम करणे बंधनकारक राहिल, आपण काम न करता इतरांना काम करण्यास दिल्यास आपली अनामत रक्कम जप्त करण्यात येईल. व शासनाच्या काळया यादीत नांव टाकण्या बाबतची शिफारस करण्यात येईल.

२२. वसतिगृहात पुरविण्यात येणा-या कंत्राटी कर्मचा-यांकडून न्यायालयात एखादी तक्रार दाखल झाल्यास त्या बाबतची सर्व जबाबदारी निवड केलेल्या संस्थेची राहिल.

२३. संस्था निवडी बाबत कोणताही वाद निर्माण झाल्यास त्यावर अंतीम निर्णय घेण्याचे अधिकार जिल्हाधिकारी परभणी यांनी राखून ठेवले आहेत.

२४. वसतिगृहाचे कामकाज व्यवस्थीतरित्या चालू राहण्यासाठी आवश्यक वाटतील अशा अटी व शर्ती करारनाम्यामध्ये समाविष्ट करण्याची मुभा जिल्हाधिकारी परभणी यांना राहिल.

**जिल्हाधिकारी,परभणी**